# हरवलेली ट्रॉफी

## आणि इतर कथा

दिलीप प्रभावळकर

राजहंस प्रकाशन



नाटक आणि खेळ आवडणाऱ्या
सर्व बालमित्र-मैत्रिणींना
आणि
बालपणीच्या आठवणींमध्ये रमणाऱ्या
प्रौढांना


# अनुक्रम

बॅडमिंटनची अंतिम फेरी
९

आमचं उत्सवातलं नाटक
३६

हरवलेल्या ट्रॉफीचा शोध
६७





# १
# बॅडमिंटनची अंतिम फेरी

आमच्या भल्यामोठ्या 'शारदा सहनिवासा'त (आम्ही सहनिवास न म्हणता सोसायटी म्हणत असू.) आम्हाला खेळायला भरपूर वाव होता. वेगवेगळे खेळ. त्या वेळी (मोटार) गाड्या आजच्या एवढ्या संख्येने नसल्यामुळे इमारतींच्या मधल्या प्रशस्त जागेत क्रिकेट, व्हॉलीबॉलपासून फुटबॉल, बॅडमिंटनपर्यंत आणि लगोरी, कबड्डीपासून (त्यावेळचं 'हुतुतू') खोखो, आट्यापाट्यापर्यंत विविध प्रकारचे खेळ होते. सोसायटीच्या सार्वजनिक हॉलमध्ये मधोमध टेबलटेनिसचं टेबल आणि बाजूला दोन कॅरमबोर्ड लावून ठेवलेले होते. शिवाय एका कोपऱ्यात बुद्धिबळाचा बोर्ड होता. एकाच वेळी हे सगळे खेळ हॉलमध्ये चालू असत. दिवसा बाहेरचे, मोकळ्या जागेतले, संध्याकाळपासून हॉलमधले.


पण ह्या सगळ्यात जास्त भाव खाणारा खेळ होता बॅडमिंटनचा. तो मात्र सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री कधीही खेळला जायचा. कधी नेट लावून, तर कधी नेटशिवायसुद्धा. वेगवेगळ्या वयाच्या मंडळींच्या वेगवेगळ्या वेळा होत्या. बॅडमिंटनला सोसायटीत एक वेगळंच वलय होतं! दोन इमारतींसमोर, व्यवस्थित रंगवून आखलेल्या पट्ट्यांची बॅडमिंटन कोर्ट होती. दोन मेटलच्या खांबांना ताणलेलं नेट (जाळी) बांधून, स्पेशल दिवे वगैरे लावून पद्धतशीरपणे बॅडमिंटन खेळलं जाई.

सूर्य मावळला आणि घरोघरी दिवेलागणीची वेळ झाली, की हॉलमधले आणि त्याबरोबरच बॅडमिंटन कोर्टचे दिवे उजळत. नेट बांधलं जाई. शटल टेस्ट केली जात आणि मग पद्धतशीर बॅडमिंटनला सुरुवात होई.

माझी आई (आणखी काही मित्रांच्या आयांबरोबर) उत्साहानं तयारी, जामानिमा करून पाचवारी साडीवरच कॅनव्हासचे शूज घालून खाली बॅडमिंटन खेळायला उतरे. (आईच्या व्हाईट शूजना ओल्या पांढऱ्या खडूनं पांढरेशुभ्र करायचं काम मी रात्री झोपायच्या आधी करत असे. मग सकाळी आठवणीनं

संध्याकाळ झाली, की बॅडमिंटन कोर्टावर असलेली पोरं-सोरं बाजूला होत. 'फिटनेस'साठी किंवा वजन कमी करण्यासाठी खेळणारेही आपला खेळ आवरता घेत आणि खरोखर प्रेक्षणीय, वेगवान बॅडमिंटन खेळणारे सोसायटीचे स्टार-प्लेयर कोर्टचा ताबा घेत. आम्हा मुलांना अशा वेळी कोर्टावर जाण्यास मज्जाव असे. म्हणजे ते खेळणारे कोणी काही बोलत नसत. पण त्यांच्याबरोबर आपल्या अर्ध्या-कच्च्या तयारीचा, हौसेचा बॅडमिंटन गेम खेळण्यापेक्षा, त्यांचा खेळ कोर्टाच्या बाहेर उभे राहून बघत राहणं, हेच आम्हाला आवडे.

एकदा काय झालं, आंतरसहनिवास बॅडमिंटन स्पर्धा ठरली. मुंबईतली अशी ही पहिलीच स्पर्धा होती त्या वेळी! 'बॉंबे इंटरसोसायटी बॅडमिंटन टुर्नामेंट!' त्यामुळे मोठा गवगवा झाला. खासदार स. का. पाटील



झेपला नाही. त्यांचे शॉट्स परतवताच आले नाहीत. गेमच्या शेवटी तर त्या एका जागी खिळून बघत राहायच्या. आमची सोसायटी हरली.

लगेच बक्षीससमारंभ झाला. मुद्दाम या सामन्यासाठी (उशिरा येऊन बसलेले) आमच्या भागाचे नगरसेवक डॉ. सावळाराम मुटेकर यांच्या हस्ते ‘लोकमान्य कॉलनी’ला मोठ्ठा चषक देण्यात आला. फोटो काढले गेले. ‘लोकमान्य कॉलनी’च्या प्रेक्षकांनी आणि खेळाडूंनी जल्लोश केला आणि मग मोठ्या दिमाखात ती ट्रॉफी घेऊन ते गेले. त्यांच्या गाड्या, स्कुटर (आणि रामानंद मसुदेंची सायकल) दिसेनाशा होईपर्यंत आम्ही हात हलवत (पण खिन्न चेहऱ्यांनी) सोसायटीच्या गेटकडे उभे होतो. बॅडमिंटन स्पर्धेच्या सोहळ्यावर पडदा पडला.

हे असं सगळं झालं... काही दिवस गेले. मग एक दिवस अचानक एक बातमी आली. कुणाला तरी शोध लागला. ट्रॉफी जिंकणाऱ्या टीममधल्या -



# २
# आमचं उत्सवातलं नाटक

वशा माझा मित्र. अगदी जिवलग. आम्ही एकाच सोसायटीतले आणि एकाच शाळेतले. नुसते शाळेतलेच नव्हे, तर एकाच वर्गातले. म्हणजे वर्गमित्र आणि सहनिवास मित्र. स्वभाव काहीसे वेगळे. मी बुजरा, तो धीट. मी अभ्यासात चांगला, तो अधिक चांगला. मी चोरून खोड्या करणारा, तो बिनधास्त. पण दोघांची गाढ, अगदी घट्ट मैत्री. मनातलं एकमेकांना सांगण्याएवढी.

तर हा माझा मित्र वशा अचानक गायब झाला! तेही गणपती उत्सवाच्या धामधुमीत. घरच्यांनाही माहीत नाही – का गेला, कुठे गेला, कसा गेला. त्यांनी उलट त्याचे मित्र म्हणून आमच्याकडेच चौकशी केली, आम्हाला तरी काही माहीत आहे का, हे विचारायला. (माझ्याकडे तर जास्तच. अगदी खोदून खोदून!) म्हणजे गणपती उत्सवातल्या नाटकाची तालीम सुरू झाली, तेव्हा तो होता. त्याची आई त्याला हाताला धरून घेऊन आली होती. तो अगदी मनाविरुद्ध आल्यासारखा दिसत होता. आमच्यापासून लांब अंतरावर एका कोपऱ्यात बसला होता.

पण मग रंगीत तालमीच्या वेळी तो कुठे दिसेचना. नाटकात त्याला दोन छोट्या भूमिका दिल्या होत्या. कपडेबिपडेही त्याच्या मापाचे आले होते. पण तो एकदम गायबच झाला. आमच्यातल्या सुध्याचा - सुधींद्रचा - दादा स्वत:ला डिटेक्टिव समजायचा. 'पी.डी.पी.', म्हणजे 'प्रायव्हेट डिटेक्टिव पद्या' म्हणवून घ्यायचा! (मूळ नाव प्रदीप.) त्यांचे बाबा त्याला 'शेरलॉक होम्स' या जगप्रसिद्ध डिटेक्टिवच्या (भाषांतरित) गोष्टी साभिनय वाचून दाखवायचे. सुध्याला वाचनाची अजिबात आवड नव्हती. पण हा पद्यादादा मात्र मन लावून ऐकायचा म्हणे. अगदी रंगून जायचा. तेव्हापासूनच तो स्वत:ला डिटेक्टिव समजायला लागला होता. त्याला उगाच ज्यात-त्यात रहस्य दिसायचं. न झालेल्या चोऱ्या आणि न घडलेले गुन्हे त्याला

सतत खुणावत असत. तर हरवलेल्या वशाच्या तपासाची सूत्रं पद्यादादाने हातात घेतली! स्वत:च! तसं तो येता-जाता आम्हाला सांगू लागला. म्हणजे वशाच्या घरचे काळजीत, आम्हाला - त्याच्या मित्रांनाही - चिंता शिवाय उत्कंठा आणि पद्यादादाच्या अंगात मात्र (त्या वेळी) एखाद्या रहस्यकथेतल्या डिटेक्टिवचा संचार!

हे सगळं झालं कसं? आणि केव्हा? सांगतो.

पावसाचा मोसम आला, तेव्हा आम्हाला हवाहवासा वाटणारा गणेशोत्सव आणि हवीहवीशी वाटणारी उत्सवातली नाटकं - यांची तयारी सुरू झाली, त्या वेळी! आमच्या भल्यामोठ्या सोसायटीमधला हा मोसम गणपती उत्सवाचा, म्हणजे आमच्यासाठी त्या उत्सवातल्या विविध कार्यक्रमांचा. विशेषत: कार्यक्रमांमधल्या नाटकांचा.



प्रत्यक्ष नाटकाला तो घाबरतो आहे. म्हणजे प्रेक्षकांसमोर नाटक करायला.'' पद्मादादानं खुलासा केला.

आम्हा मित्रांना हे कळलं, तेव्हा आश्चर्यच वाटलं. बाळू (इंग्लिश मिडियम) आम्हाला म्हणाला, ''अरे, याला 'स्टेज फ्राइट' म्हणतात. एरवी धीट, बडबडी किंवा दादागिरी करणारी मुलंसुद्धा नाटकात एखादा रोल करायला लोकांसमोर उभी राहिली, की फाफलतात. त्यांना घाम फुटतो. त्यांची बोबडीच वळते.'' पंपूशेठची भूमिका करणारा सौदागर म्हणाला, ''हो, तो दोन-तीनदा म्हणाला होता खरं मला - कसा काय तुम्ही एवढा मोठ्ठा रोल करणार आहात! भीती नाही वाटत तुम्हाला प्रेक्षकांची?''



# ३

# हरवलेल्या ट्रॉफीचा शोध

सोसायटीच्या बागेच्या कट्ट्यावर आम्ही मुलं खेळ संपवून बसलो होतो. काहींनी पाय पसरले होते, काही जण पाय हलवत होते, तर मी आणि बाळू पाय दुमडून गुडघ्यांना मिठी मारून बसलो होतो. आमच्या गप्पा रंगल्या होत्या. कोणीतरी विषय काढला आणि मग आठवणी निघाल्या. आधी बॅडमिंटन फायनल मॅचच्या, जिंकलेल्या ट्रॉफीच्या आणि मग 'कवडीचुंबक' नाटकाच्या. बाकीच्यांना नाटक बघताना फार गंमत वाटली होती. (रंगलाच



होता तो प्रयोग.) पण नाटकाच्या आतल्या गमती कुणालाच माहीत नव्हत्या. कशा कळणार? बिन्न्या आणि प्रकाशनं मला फारच आग्रह केल्यावर मी दोन-चार सांगितल्या आठवून आठवून. प्रेमाचे संवाद म्हणताना कशी बोबडी वळत असे, हे मी कबूल केल्यावर मग मुलींवरून थोडी चिडवाचिडवी झाली. सगळं तसं गमतीगमतीतच चाललं होतं. तेवढ्यात विलू आला आणि भांडणाला सुरुवात झाली. खरं म्हणजे विलू जिमकर काही आमच्या मित्रांमधला नव्हता. तो वयानं मोठा. त्यातून उपद्व्यापी. दर वेळी त्याच्या 'उद्योगां'मध्ये मदत करायला आम्हाला दोघा-तिघांना बोलवायचा. एरवी कधी आमच्यात यायचा नाही. पण आज आला.

"काय चाललंय रे तुमचं?" त्यानं विचारलं.

"काही नाही, गप्पा मारतोय." विन्या म्हणाला.

"नाटकाच्या ना? ऐकलं मी."

"हो, आपल्या गणेशोत्सवातलं कवडीचुंबक. काय मस्त झालं होतं, एवढ्या अडचणी येऊन."

"तू पाहिलं ना विलू? मजा आली होती की नाही? काय रंगलं होतं."

"छ्या... मी नाही पाहिलं. आपण नाही पाहत नाटकं-बिटकं. खेळ खरे. नाटकं खोटी खोटी." आम्हाला काही पटलं नाही. विलूनं आमची सोसायटी बॅडमिंटन मॅचेस जिंकावी, म्हणून केलेले एकेक उद्योग आठवले. बॅडमिंटन तर त्याच्या खास आवडीचा खेळ होता. तसा तो आमचाही होता. पण म्हणून काय सरसकट नाटकाला मोडीत काढायचं?

"वशाच्या बाबांनी काय मस्त केला आयत्या वेळी रोल आणि याला पण केशरच्या भूमिकेसाठी बक्षीस मिळालं." विन्यानी विनाकारण मला त्यात ओढलं. पण मग विलू हिणवू लागला.

"नाटकात काय कोणीही काम करू शकतो. स्पोर्ट्सचं तसं नाही. कसब लागतं. बॅडमिंटन कुणालाही नाही खेळता येणार. करंडक जिंकणं, तर आणखी कठीण. तो जिंकला की नाही आपण? तुम्ही नाटकं करा नाटकं." विलूनं असं म्हणताच परेश चिडला. त्याच्या घरातले सगळेच नाटकवेडे होते. तो वाद घालू लागला. मी नाटकात एवढं कामबीम करूनसुद्धा काही बोललो नाही. गप्प राहिलो. पण विलूनं मला विनाकारण टप्पल मारली. "केशर म्हणे केशर! तोंड बघा तोंड बघा." विलूच्या त्या टपलेनं आणि